# सांगली जिल्हा परिषद सांगली

| जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा कार्यवृत्तांत. भाग-१. | | |
|---|---|---|
| सभा क्र - १७ | दिनांक २२-०५-२०१५ | वेळ दु.१२.०० वाजता |

| अ.क्र | उपस्थित पदाधिकारी व सभासदांची नांवे | पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. श्रीम.रेशमाक्का उर्फ रशमाक्का मदगोंडा होर्ती उर्फ होर्तीकर | अध्यक्ष,तथा सभापती स्थायी समिती, व जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती |
| २. | मा. श्री.लिंबाजी महीपती पाटील | उपाध्यक्ष, व सभापती अर्थ व शिक्षण समिती |
| ३. | मा. श्री.गजानन शिवलिंग कोठावळे | सभापती , बांधकाम व आरोग्य समिती |
| ४. | मा. सौ.मनिषा तानाजी पाटील | सभापती, कृषि,पशुसंवर्धन व दुग्धशाळा विकास समिती |
| ५. | मा. सौ.उज्वला अशोक लांडगे | सभापती, समाजकल्याण समिती |
| ६. | मा. सौ.पपाली यशवंत कचरे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ७. | सौ.कुसूम नाना मोटे | सदस्या |
| ८. | श्री.आबासाहेब नरसिंगराव देशमुख | सदस्य |
| ९. | श्री.बसवराज सिदगोंडा पाटील | सदस्य |
| १०. | सौ.सुशिला महादेव होनमोरे | सदस्य |
| ११. | श्री.संजीवकुमार आबासो सावंत | सदस्य |
| १२. | श्री.सूर्यकांत उर्फ हरीबा यल्लाप्पा मुटेकर | सदस्य |
| १३. | सौ.मिनाक्षी शरणाप्पा अक्की | सदस्य |
| १४. | सौ.सुनंदा रमेश पाटील | सदस्या |
| १५. | सौ.रूपाली विक्रमसिंह पाटील | सदस्या |
| १६. | श्री.अशोक रामचंद्र सांगलीकर | सदस्य |
| १७. | श्री.किसन गणपती जानकर | सदस्य |
| १८. | श्री.फिरोज शिराज शेख | सदस्य |
| १९. | श्री.सुहास मालोजी शिंदे | सदस्य |
| २०. | श्री.नामदेव आण्णा माळी | सदस्य |
| २१. | श्री.शांताराम (बापू)मोहनराव कदम | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| २२. | सौ.सुवर्णा संभाजीराव पिंगळे | सदस्य |
| २३. | श्री.सुरेश गणपतराव मोहिते (पाटील) | सदस्य |
| २४. | श्री.वैभव कांतीनाथ गायकवाड | सदस्य |
| २५. | सौ.अनुसया सिताराम रणखांबे | सदस्य |
| २६. | सौ.कल्पना वसंतराव सावंत | सदस्य |
| २७. | सौ.छाया अरुण खरमाटे | सदस्या |
| २८. | सौ.शुभांगी मधुकर पाटील | सदस्या |
| २९. | सौ.स्नेहल अनिल पाटील | सदस्या |
| ३०. | श्रीम.योजना सुभाषराव शिंदे | सदस्या |
| ३१. | सौ.राधाबाई चंद्रकांत हाक्के | सदस्या |
| ३२. | श्री. दत्ताजीराव निळकंठराव पाटील | सदस्य |
| ३३. | श्री.भाऊसाहेब शामराव पाटील | सदस्य |
| ३४. | श्री.तानाजी हरी यमगर | सदस्य |
| ३५. | सौ.शर्मिला राजेंद्र लाड | सदस्या |
| ३६. | सौ.निशा विक्रम पाटील | सदस्या |
| ३७. | श्री.हेमंत बालाजी पाटील | सदस्य |
| ३८. | सौ.शिलाताई चंद्रकांत सुर्यवंशी | सदस्या |
| ३९. | सौ.भारती शहाजी गुरव | सदस्या |
| ४०. | सौ.सुनिता बाळासो वाकळे | सदस्या |
| ४१. | सौ.जयश्री जितेंद्र पाटील | सदस्या |
| ४२. | श्री.देवराज जनार्दन पाटील | सदस्य |
| ४३. | श्री.सम्राट नानासो महाडीक | सदस्य |
| ४४. | श्री.राजेंद्र कुमार लालासाहेब पाटील | सदस्य |
| ४५. | श्री.रणजीत जगदीश पाटील | सदस्य |
| ४६. | सौ.मिना पोपट मलगुंडे | सदस्य |
| ४७. | सौ.मिनाक्षी नानासाहेब महाडिक | सदस्य |
| ४८. | सौ.सुशिला हिंदूराव नांगरे | सदस्य |
| ४९. | श्री.रणधीर शिवाजीराव नाईक | सदस्य |
| ५०. | सौ.सुवर्णा विकास नांगरे | सदस्या |
| ५१. | सौ.वैशाली अभिजितसिंह नाईक | सदस्या |
| ५२. | श्री.जगन्नाथ बापू लोहार | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ५३. | श्री. राजेंद्र महादेव माळी | सदस्य |
| ५४. | श्री.प्रकाश बजरंग कांबळे | सदस्या |
| ५५. | श्री.आप्पासो भूपाल हुळ्ळे | सदस्य |
| ५६. | सौ.पवित्रा राजेंद्र बरगाले | सदस्य |
| ५७. | श्री.शिवाजी (पप्पू)राजाराम डोंगरे | सदस्य |
| ५८. | सौ.संयोगिता प्रकाश कोळी | सदस्या |
| ५९. | श्री.भिमराव बाळासो माने | सदस्य |
| ६०. | सौ.मंगल सुरेश कोळी | सदस्या |
| ६१. | श्री.प्रकाश गणपती देसाई | सदस्य |
| ६२. | सौ.देशमुख सुमन काशिनाथ | सभापती पं.स.आटपाडी |
| ६३. | सौ.माळी वैशाली दिपक | सभापती पं.स.खानापूर |
| ६४. | सौ.महाडीक लता चंद्रकांत | सभापती पं.स.कडेगांव |
| ६५. | सौ.पाटील हर्षला संजय | सभापती पं.स.तासगांव |
| ६६. | सौ.वैशाली राजेंद्रकुमार उर्फ रजनीकांत पाटील | सभापती पं.स.क.महंकाळ |
| ६७. | श्री.विजय भूपालकांबळे | सभापती पं.स.पलूस |
| ६८. | श्री.रविंद्र दादासो बर्डे | सभापती पं.स.वाळवा |
| ६९. | श्री.चंद्रकांत दादा पाटील | सभापती पं.स.शिराळा |
| ७०. | श्री.दिलीप दत्तू बुरसे | सभापती पं.स.मिरज |

**सांगली जिल्हा परिषद सांगली**
**जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा कार्यवृतांत भाग -१**

| अ.क | उपस्थित अधिकारी व कर्मचारी | पदनाम |
|---|---|---|
| १. | मा.श्री.सतिश लोखंडे | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २. | मा.श्री.दिलीप पाटील | अति.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३. | मा.श्री.अजयकुमार माने | प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.सांगली. |
| ४. | श्री.विक्रांत बगाडे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) तथा सचिव |
| ५. | सौ.शुभांगी पाटोळे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ६. | श्री.रविकांत अडसूळ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) |
| ७. | श्री.किरण जाधव | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क) |
| ८. | श्री.आर.जे.भोसले | कृषि विकास अधिकारी |
| ९. | श्री.राम हंकारे | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| १०. | सौ.सुगता पुन्ने | शिक्षणाधिकारी (प्रा) |
| ११. | सौ.निशादेवी वाघमोडे | शिक्षणाधिकारी (नि) |

| | | |
|---|---|---|
| १२. | श्री.पृथ्वीराज चव्हाण | कार्यकारी अभियंता (बांध) |
| १३. | श्री.एस.जी.सादिगले | कार्यकारी अभियंता (ग्रापापु) |
| १४. | श्री.बी.जे.पाटील | उप कार्यकारी अभियंता (छोपावि) |
| १५. | श्री.सचिन कवले | जिल्हा समाजकल्याण अधिकारी |
| १६. | श्री.बी.जे.पाटील | उपमुख्य कार्यकारी अभियंता (छोपावि) |
| १७. | श्री.उत्तम थोरात | उप अभियंता (भूजल) जिल्हा परिषद |
| १८. | श्री.जे.वाय.काळे | उप अभियंता जि.ग्रा.वि.यं.सांगली |
| १९. | श्री.एस.डी.देसाई | उप शिक्षणाधिकारी (मा) |
| २०. | डॉ.सी.डी.सुतार | पशुधन विकास अधिकारी (तां) |
| २१. | श्री.सु.वा.क्षिरसागर | कार्यकारी अभियंता(प्र) महावितरण सांगली. |
| २२. | श्री.व्ही.डी.नागरगोजे | कार्यकारी अभियंता म.जि.प्रा.सांगली. |
| २३. | श्री.के.एस.मोमीन | (तं.अ.)जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सांगली |
| २४. | श्री.एस.एस.गोंधळी | प्र.सहा.भू.वै.ग्रापापु सांगली. |
| २५. | श्री.आर.एस.कोरे | निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क सांगली. |
| २६. | श्री.आय.व्ही.कोलप | दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क सांगली. |
| २७. | श्री.एस.ए.माने | क. भू वैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,सांगली. |
| २८. | श्री.डी.जे.कोंडेकर | उप विभागीय अधिकारी लघू सिं. (जलसंधारण)सांगली. |
| २९. | श्री.डी.वाय.खिलारे | स.वा.अ.महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सांगली आगार |
| ३०. | श्री.जी.डी.सुर्यवंशी | वा. नि.महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सांगली आगार |
| ३१. | श्री.के.एस.उमराणीकर | सहा.जिल्हा.समन्वय अधिकारी मा.वि.म |
| ३२. | श्री.आर.आर.वेदांत | शा.अ.ग्रा.पा.पु.जि.प.सांगली. |
| ३३. | श्री.पी.बी.मुरगुडे | शाखा अभियंता प्रधानमंत्री ग्राम सडक योजना सांगली. |
| ३४. | श्री.एन.एस.बेल्लारीकर | शाखा अभियंता. |
| ३५. | श्री.के.जी.मोरे | शाखा अभियंता (छोपावि) |
| ३६. | श्री.अे.जी.पाटील | शा.अ.बांधकाम विभाग जि.प.सांगली. |
| ३७. | श्री.व्ही.एन.कुलकर्णी | लेखाधिकारी महिला आर्थिक विकास महामंडळ |
| ३८. | श्री.फिरोज शेख | अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग, |
| ३९. | श्रीम.शुभदा चिटणिस | लघू लेखक, सामान्य प्रशासन विभाग. |
| ४०. | श्री.सुशांत पाटील | लघू लेखक, शिक्षण (प्राथ) |
| ४१. | श्री.डी.टी.तोडकर | व.सहा.साप्रवि सांगली. |
| ४२. | श्री.कांबळे ए.एस. | व.ले.अधिकारी जि.प.सांगली |
| ४३. | श्री.नागवेकर अ.अ. | क.ले.अ. मुद्रणालय |
| ४४. | श्री.पी.एच. जगताप | क.सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग,(सभा शाखा) |
| ४५. | श्री.आर.डी.हंबर | क.सहा. साप्रवि |
| ४६. | श्री.बी.एस.माळी | आरोग्य सहा.जि.प. |

## संक्षिप्त कार्यवृतांत

दिनांक २२/०५/२०१५ रोजी मा.वसंतरावदादा पाटील सभागृह जि.प.सांगली येथे जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा संपन्न झाली. सभेसाठी उपस्थित असलेले जि.प./पं.स.चे सर्व सन्मा.सभापती, सन्माननीय जि.प.सदस्य, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व खातेप्रमुख शासकीय अधिकारी / कर्मचारी, पत्रकार बंधू यांचे मा.श्रीमती रेश्माक्का होर्तीकर,अध्यक्षा, जिल्हा परिषद सांगली यांनी स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करणेबाबत सूचित केले.

सुरुवातीस श्री. लिंबाजी पाटील, उपाध्यक्ष, जि.प. सांगली यांनी कांही मान्यवरांच्या दु:खद निधनाबद्यल खालीलप्रमाणे दु:खवटयाचे ठराव मांडले. त्यास सभागृहात सर्वानुमते मान्यता देणेत आली.

**<u>दु:खवटयाचे ठराव:-</u>**

१) भारताच्या शेजारील देश नेपाळ मध्ये नुकत्याच झालेल्या भूकंपामध्ये नेपाळमधील व तेथे वास्तव्यास असणारे भारतीय नागरिकांचे दु:खद निधन झाले. तसेच भारतातील कांही राज्यामध्ये भूकंप होऊन मनुष्य हानी झालेली आहे.

२) श्री.प्रकाश कांबळे :- प्रधान सचिव यांचे स्वीय सहाय्यक बेळंकी गावचे सुपुत्र श्री.बाबासाहेब वाघमारे यांच्या मातोश्री कै.सरस्वती वाघमारे,यांचे अल्पशा आजाराने दुखद निधन

३) शेगांव ता.जत येथील जि.प.सदस्य सौ.कांचनताई बोराडे यांचे सासरे श्री. कृष्णराव बाबूराव बोराडे यांचे निधन झाले.

ही सभा वरील सर्वाच्या दुखद निधनाबद्दल शोक व्यक्त करीत आहे व त्यांच्या कुटूंबियाच्या दु:खात सहभागी होत आहे. ईश्वर दिवगंताचे आत्म्यास शांती व सद्गती देवो अशी प्रार्थना करुन सभागृहात दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली वहाणेत आली.त्यानंतर खालीलप्रमाणे अभिनंदनाचे ठराव मांडणेत आले.

**अभिनंदनाचे ठराव :-**

**श्री.सुरेश मोहिते, सदस्य यांनी खालीलप्रमाणे अभिनंदनाचे ठराव मांडले.**

**१) श्रीमती अमिना आब्बास नदाफ, आरोग्य सहाय्यिका, प्रा.आ.केंद्र, आगळगांव यांना केंद्र शासनाकडून फ्लोरेन्स नाईन्टेंगल हा देशस्तरीय सन्मान.**

केंद्र शासनाकडून परिचर्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या परचारिकांना केंद्र शासनामार्फत हा पुरस्कार देण्यात येतो. सन २०१५ या वर्षीचा पुरस्कार सांगली जिल्हयातील श्रीमती अमिना आब्बास नदाफ, आरोग्य सहाय्यिका, प्रा.आ.केंद्र, आगळगांव ता.कवठेमहंकाळ जि.सांगली यांना मा.राष्ट्रपती यांच्या हस्ते रोख रक्कम रु. ५००००/-, पदक व प्रमाणपत्र दि. १२ मे २०१५ रोजी दिल्ली येथे देणेत आले आहे.

तसेच त्यांची उल्लेखनीय कामाची दखल घेवून शासनाने ७ एप्रिल २००७ रोजी बिसूर उपकेंद्रास राज्यस्तरीय आनंदीबाई गोपाळ जोशी प्रथम पुरस्काराने सन्मानीत केले होते.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकिय अधिकारी, जिल्हा तालुका व प्रा.आ.केंद्राकडील सर्व कर्मचारी वृंद व जनतेचे सहयोग व सहकार्याने सदरची देशात उल्लेखनीय कामगिरी झाली आहे. त्याबद्दल त्यांचे ही सभा अभिनंदन करीत आहे.

**२) जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद,सांगली राज्यात प्रथम.**

आरोग्य विभागामार्फत देण्यात येत असलेल्या सेवांचे मा.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचेकडून प्रतिमहा सर्व जिल्हयांच्या जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या कामाचे मुल्यमापन केले जाते व त्यानुसार गुणानुक्रम देण्यात येतो. माहे जुलै २०१४ पासून गुणानुक्रम पध्दत सुरु झाली असून सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात डॉ. राम हंकारे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.सांगली राज्यामध्ये प्रथम आलेले आहेत.

सदरचे मूल्यमापन आरोग्य संस्थांमधील पायाभूत सुविधा, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम, ग्राम बाल विकास कार्यक्रम, किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम, असंर्गजन्य आजार नियंत्रण, आरोग्य माहिती व्यवस्थापन पध्दती व माहिती अद्ययावतीकरण, १०२, १०४ व १०८ वाहनाव्दारे संदर्भ सेवा, प्रशासकीय बाबी, आर्थिक वर्षातील खर्चाचा लेखा जोखा, साथरोग उद्रेक अहवाल, सादरीकरण व कायापालट अंतर्गत नाविन्यपूर्ण योजना या दर्शकामध्ये केलेल्या उद्दिष्टपूर्तीवर केले जाते.

मा.अध्यक्ष, मा.जिल्हाधिकारी, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपाध्यक्ष, मा.सभापती,बांधकाम व आरोग्य समिती, सर्व विषय समित्यांचे सभापती, पं.स.सभापती, जि.प.व पं.स.सदस्य, जिल्हास्तरीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकिय अधिकारी, जिल्हा, तालुका व प्रा.आ.केंद्राकडील सर्व कर्मचारीवृंद व जनतेचे सहयोग व सहकार्याने सदरचे यश प्राप्त झाले आहे. त्याबद्दल त्यांचे ही सभा अभिनंदन करीत आहे.

**३) बालस्वास्थ्य आरोग्य कार्यक्रमांतार्गत १२७ बालकांवर हृदय शस्त्रक्रिया**

राज्य शासनाच्या बाल स्वास्थ्य आरोग्य कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ मध्ये ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलांची मोफत तपासणी करुन १२७ बालकांच्या मोफत हृदय शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. तसेच ४५१ बालकांच्या हार्निया, तुटलेले ओठ जोडणे, अस्थिव्यंग, नाक-कान-घसा इ. विषयक शस्त्रक्रिया पथकाने केलेल्या आहेत.

राजीवगांधी जीवनदायी योजनेअंतर्गत न झालेल्या शस्त्रक्रिया सुराना हॉस्पिटल मुंबई, सेवन हिल हॉस्पिटल, मुंबई, सी.पी.आर.हॉस्पिटल कोल्हापूर इ.ठिकाणी झालेल्या आहेत. शस्त्रक्रियेसाठी पालक व लाभार्थींची प्रवास, निवास व भोजन व्यवस्था मोफत करण्यात आली होती. यासाठी डॉ. प्रमोद चौधरी, जिल्हा कार्यक्रम समन्वयक, व त्यांचेकडील अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम केले. शिबीरास आरोग्य मंत्री मा.डॉ.दिपक सावंत यांनी मुंबई येथे भेट देऊन अभिनंदन केले.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.सभापती, बांधकाम व आरोग्य समिती, मा.जिल्हा आरोग्य अधिकारी, मा.जिल्हा शल्य चिकित्सक, प्रा.आ.केंद्राकडील सर्व कर्मचारीवृंद व जनतेचे सहयोग व सहकार्याने सदरचे यश प्राप्त झाले आहे. त्याबद्दल त्यांचे ही सभा अभिनंदन करीत आहे.

**श्रीमती छाया खरमाटे, सदस्या यांनी खालीलप्रमाणे अभिनंदनाचा ठराव मांडला.**

४) श्री.विकास सुर्यवंशी - केसरी वृत्तपत्र विक्रेता उपाध्यक्ष पदी निवड झालेबद्दल त्याबद्दल त्यांचे ही सभा अभिनंदन करीत आहे.

५). तिसरा डोळा साप्ताहिक वृत्तपत्राचे संपादक श्री. सतीश चव्हाण यांनी सातत्याने त्यांचे वृत्तपत्रात महिलांचे प्रश्न मांडले. त्यामुळे आरोग्य समिती सभेमध्ये जिल्हा परिषदेच्या इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर स्वच्छतागृह बांधणेचा निर्णय घेतला त्याबद्दल त्यांचे ही सभा अभिनंदन करीत आहे.

६) जय महाराष्ट्र या टी.व्ही.चॅनेलचे श्री. दिपक चव्हाण यांचे चेन्नई येथे महाराष्ट्राचा स्पीकर म्हणून निवड झाले त्याबद्दल त्यांचे ही सभा अभिनंदन करीत आहे.

**सौ. जयश्री पाटील, सदस्या यांनी खालीलप्रमाणे अभिनंदनाचा ठराव मांडला.**

७) राजीवगांधी जीवनदायी योजनेमध्ये बसत नसलेल्या तीन वर्षाच्या मुलीचे ब्रेन टयुमर ऑपरेशन करणेस मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मोलाचे सहकार्य केले. त्याबद्दल मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची ही सभा अभिनंदन करीत आहे.

**श्री.प्रकाश कांबळे, सदस्य यांनी खालीलप्रमाणे अभिनंदनाचा ठराव मांडला.**

८) डॉ.व्यकटराव माणिकराव घोरपडे, पविअ/म्हैसाळ, ता.मिरज यांनी पशुसंवर्धन खात्याचे बोधचिन्ह (लोगो) तयार करुन पशुसंवर्धन खात्यास सादर केले नंतर एकूण ५४ सादर झालेल्या लोगो पैकी डॉ.घोरपडे यांच्या बोधचिन्हास शासन मान्यता मिळाली आहे. त्यांच्या या कल्पक कामगिरी त्याबद्दल त्यांचे ही सभा अभिनंदन करीत आहे.

**सौ.सुनिता वाकळे, सदस्या यांनी खालीलप्रमाणे अभिनंदनाचा ठराव मांडला.**

९) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सांगलीच्या अध्यक्षपदी मा.श्री. दिलीप पाटील ता.वाळवा. यांची निवड झालेबद्यल त्यांचे ही सभा अभिनंदन करीत आहे.

१०) श्री.दादासो.मोरे, रा.रेठरेहरणाक्ष ता.वाळवा यांची राजारामबापू साखर कारखाना,साखराळेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झालेबद्दल त्यांचेअभिनंदन.

**श्री.सुरेश मोहिते, सदस्य यांनी खालीलप्रमाणे अभिनंदनाचा ठराव मांडला.**

११) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सांगलीच्या उपाध्यक्षपदी श्री. संग्रामसिंह संपतराव देशमुख (भाऊ) रा.कडेपूर, ता.कडेगांव यांची निवड झालेबद्दल त्यांचे ही सभा अभिनंदन करीत आहे..

**श्रीमती योजना शिंदे, सदस्या यांनी खालीलप्रमाणे अभिनंदनाचा ठराव मांडला.**

१२) रेठरे हरणाक्ष येथील श्री. अभिजीत गुरव यांची राज्य लोक सेवा आयोगाकडून पोलिस उपनिरीक्षक पदी निवड झालेबद्दल त्यांचे ही सभा अभिनंदन करीत आहे..

**श्री.फिरोज शेख,सदस्य यांनी खालीलप्रमाणे अभिनंदनाचा ठराव मांडला. त्यास** श्री.संजीवकुमार सावंत यांनी यास अनुमोदन दिले.

१३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक :- १ मे, २०१५ रोजी सन २०१५-२०१६ या वर्षासाठी पंचायत राज समितीवर सदस्य म्हणून मा.आमदार श्री.अनिल बाबर यांची नामनियुक्ती झालेबद्दल त्यांचे ही सभा अभिनंदन करीत आहे.

यावर सभागृहात टाळयांच्या गजरात सर्वांचे हार्दिक अभिनंदन करुन शुभेच्छा देण्यात आल्या.

सदरचे ठराव सभागृहात सर्वानुमते मंजूर करणेत आले.

**मा.श्रीमती रेश्माक्का होर्तीकर,अध्यक्षा :-** श्रीमती अमिना नदाफ, प्रा.आ.केंद्र, आगळगांव यांना केंद्रशासनामार्फत पुरस्कार मिळालेला आहे. त्यांच्या उल्लेखनिय कामाची दखल घेवून त्यांना हा मोठा पुरस्कार मिळालेला आहे. त्यांच्या उल्लेखनिय कामगिरीची दखल घेवून जिल्हा परिषदेच्या वतीनेही र.रु.५००००/- रोख रक्कम देऊन त्यांना सन्मानीत करावे असा प्रस्ताव सभेपुढे ठेवणेत येत आहे. तरी सर्व सन्मा.सदस्यांनी यासाठी स्वीय निधीतून तरतूद करणेत यावी.

**सौ.छाया खरमाटे, सदस्या:-** श्रीमती नदाफ यांच्या परिचर्या क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरीची केंद्र शासनाने दखल घेवून त्यांना पुरस्कार दिलेला आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेनेही त्यांच्या उत्कृष्ट कामाची दखल घेवून र.रु.५००००/- चा पुरस्कार देणेस सर्वांनी मान्यता द्यावी.सर्व सन्मा.सदस्यांनी यास संमती दिली.

त्यानंतर मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षा, यांच्या हस्ते श्रीमती अमिना नदाफ, यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व जिल्हा परिषदेच्या वतीने र.रु.५००००/- चा पुरस्कार देणेचे घोषित केले.

तसेच डॉ.श्री.राम हंकारे, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सन २०१४-१५ मध्ये केलेल्या कामाचे मुल्यांकनामध्ये राज्यामध्ये प्रथम क्रमांक मिळालेबद्यल व डॉ.चौधरी व त्यांची टिम यांनी राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया यशस्वीपणे केलेबद्दल त्यांचेही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करणेत आला.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) तथा सचिव, यानी विषय क्र.०१ :-** मागील दिनांक १२.०३.२०१५ रोजी झालेल्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे. सादर केला असता खालील प्रमाणे सभागृहात चर्चा झाली.

**श्री.सुरेश मोहिते,सदस्य:-** मागील वर्षात जि.प.सभेमध्ये जे ठराव झालेले आहेत त्यांच्यावर कार्यवाही झालेली नाही. शिवाय या सभेसाठी जे प्रश्न विचारणेत आले होते त्याची उत्तरेही समाधानकारक दिलेली नाहीत.

**श्री.सम्राट महाडिक, सदस्य:-** सर्व अधिकारी व पदाधिकारी यांनी प्रत्येक बुधवारी मुख्यालयी उपस्थित रहावे असे मागील जि.प.सभेमध्ये ठरविणेत आलेले होते. परंतू बुधवारी अधिकारी/पदाधिकारी मुख्यालयात उपस्थित नसतात असे निदर्शनास आलेले आहे. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व खातेप्रमुखांना सूचना देणेचे मान्य केले होते. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष व सर्व सभापती विषय समिती यांनीही उपस्थित रहायला पाहिजे होते यापुढे अधिकारी यांनी प्रत्येक बुधवारी मुख्यालयी उपस्थित रहाणेबाबत सक्त सूचना देणेत याव्यात.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षा:-** सर्व अधिका-यांना प्रत्येक बुधवारी मुख्यालयात हजर रहाणेबाबत कळविणेत आले आहे.

**श्री.लिंबाजी पाटील, उपाध्यक्ष:-** आम्ही आठवडयातले ५-६ दिवस उपस्थित असतो. शिवाय ज्या सदस्यांनी आपली कामे सांगितलेली आहेत त्याचा पाठपुरावा केलेला आहे.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षा:-** पुन्हा एकदा सर्व अधिका-यांना सूचना देणेत येत आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी:-** सर्व अधिका-यांना प्रत्येक बुधवारी मुख्यालयात उपस्थित रहाणेबाबत सूचना दिल्या आहेत परंतू कांही वेळा मिटींग वगैरे असल्या तर जावे लागते. फिरती अधिका-यांना अचानक कांही ठिकाणी भेटीसाठी जावे लागते. तरीही पुन्हा एकदा सर्व अधिका-यांना मुख्यालयातील उपस्थितीबाबत व तालुकास्तरावरील बैठका बुधवारी न लावणेबाबत सूचना देत आहे.

**श्री.सुरेश मोहिते, सदस्य:-** शिक्षणाधिकारी (प्राथ) यांच्या बदलीचे काय झाले? शिक्षण विभागाकडे पेन्शनची वगैरे खूप कामे प्रलंबीत आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी:-** जि.प.मध्ये दोन दिवस पेन्शन अदालत घेणेत आलेली होती. त्यावेळी आरोग्य विभाग, शिक्षण विभाग सर्वच विभागाकडील सेवानिवृत्त कर्मचारी, सेवा निवृत्त होणारे कर्मचारी यांना आवाहन केलेले होते की, ज्या कांही त्रुटी असतील त्यानुसार पूर्तता करणेत यावी. ज्यांची प्रकरणे प्रलंबीत आहेत त्यावेळी तेथे त्यांनी यायला पाहिजे होते. पेन्शन अदालतमध्ये कोण आले नाही तर आमचा नाईलाज आहे.

**श्री.सुरेश मोहिते, सदस्यः-** कर्मचारी निवृत्त होण्याच्या अगोदर सहा महिना पेन्शन प्रकरण तयार व्हायला पाहिजे. इतके वर्षे नोकरी केलेली असते त्यामुळे त्यांना सर्व लाभ मिळावेत अशी अपेक्षा असते. संगणक परीक्षा सूट किंवा हिंदी मराठी भाषा परीक्षा सूट यासाठी पेन्शन प्रकरणे प्रलंबीत राहिलेली आहेत. शिक्षणाधिकारी यांचेकडे गेले की, एकही फाईल पेंडींग नाही असे सांगणेत येते. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडेही फाईल पेंडींग रहात नाही हे आम्हाला माहित आहे. मग मंजूरीची प्रक्रीया वेळेत कां होत नाही? पाठयुपुस्तके जून मध्ये मुलांना मिळाली पाहिजेत याची सर्व जबाबदारी शिक्षणाधिकारी यांची आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारीः-** शिक्षणाधिकारी (प्राथ) यांच्या बदलीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेत आलेला आहे.बदलीचे अधिकार शासनाकडे असलेमुळे आपण कांही करु शकत नाही.

**श्री.लिंबाजी पाटील, उपाध्यक्षः-** शासनाकडे त्यांचे बदलीसाठी पाठपुरावा केलेला आहे. ५-६ दिवसात निर्णय लागेल.

**श्री.सुरेश मोहिते, सदस्यः-** आपण व्यवस्था बदलू शकत नसलो तर लोकांचा विश्वास रहात नाही. शिक्षण विभागाच्या कामाबाबत आम्ही नाराज आहेत.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षाः-** प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या बदलीबाबत शासनाकडे पाठपुरावा केलेला आहे. एक आठवडयात हा विषय संपेल.

**सौ.मिनाक्षी महाडिक, सदस्याः-** कुंडलवाडी येथील शाळेत शिक्षक कधी देणार? एवढे पैसे खर्च करुन शाळा काढली पण शिक्षक दिले नाहीत तर शाळा कशी चालू रहाणार?

**मुख्य कार्यकारी अधिकारीः-** राज्य शासनाने शिक्षक भरतीला स्थगिती दिलेली आहे. आपसी बदली फक्त आपण करु शकतो.

**सौ.मिनाक्षी महाडिक, सदस्याः-** शाळेसाठी शिक्षक देत नसाल तर गुणवत्ता दर्जा कसा सुधारणार? शाळेचा शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा टिकवावयाचा असेल तर शिक्षक दिले पाहिजेत याबाबत शासनाला कळविणेत यावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारीः-** आर.टी.ई. ॲक्ट संदर्भात शिक्षक संघटनेनी हायकोर्टात अपील केले आहे. त्यामुळे शासनाने स्थगिती दिलेली आहे.

**सौ.मिनाक्षी महाडिक, सदस्याः-** शाळांमध्ये शिक्षक दिले नाहीत तर शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा सुधारता येणार नाही

**मुख्य कार्यकारी अधिकारीः-** शिक्षकांच्या रिक्त जागा भरणेबाबत शासनाकडे पाठपुरावा करीत आहे.

**सौ.मिनाक्षी महाडिक, सदस्याः-** पती-पत्नी एकत्रीकरण बदलीचा प्रस्ताव दिलेला असताना कां बदली करत नाही? लोकप्रतिनिधींच्या शिफारशीला महत्व देत नसाल तर आम्ही मिटींगला येत नाही. गंभीर आजारपणासाठी बदली प्रस्ताव दिला तरी बदली होत नाही. जिल्हापरिषदेमध्ये आले तर पदाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी भेटत नाहीत.

**श्री.बसवराज पाटील, सदस्यः-** केंद्र शासनाने आर.टी.ई.ॲक्ट लागू केलेला आहे. तो लागू करीत असताना जि.प./पं.स./ग्रा.पं. या थ्री टायर सिस्टीममधील लोक प्रतिनिधींना विश्वासात न घेता ॲक्ट लागू केलेला आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे स्वप्न होते की, झोपडपट्टी, वाडी,वस्ती, खेडयापाडयातील सर्व मुलांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन द्यावी. परंतू शासनाने आर.टी.ई. ॲक्ट लागू केला व वाडया वस्त्यावरील शाळा बंद करण्याची परिस्थिती निर्माण

झालेली आहे. आर.टी.ई.च्या संदर्भात शिक्षणमंत्री किंवा शासनाकडे धाव न घेता ॲक्ट मधील कलम २२६ व २२७ चा पुर्नविचार झाला पाहिजे म्हणून लोकप्रतिनिधी, ग्राम शिक्षण समितीने, पं.स./जि.प.स्तरावरील पदाधिकारी यांनी रिट याचिका दाखल केली पाहिजे. तरच परिस्थिती सुधारेल व गोरगरीबांसाठीच्या वाडया वस्त्यांवरील शाळा टिकवून ठेवण्यामध्ये सुधारणा होईल. लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता केंद्र शासनाने स्विकारले तेच राज्य शासनाने स्विकारलेले आहे. कांही राज्य शासनानी हा ॲक्ट स्विकारलेला नाही. ज्यांनी स्विकारला त्यांनी बदल करुन स्विकारलेला आहे. कायद्याच्या चौकटीत बसवून शासनाला आवाहन केले पाहिजे.

**श्री.भिमराव माने, सदस्यः-** सभागृहाच्या वतीने श्री.बसवराज पाटील यांना रिटयाचिका दाखल करण्याचे अधिकार द्यावेत. तसेच सर्व सभापती व सदस्यांचे भत्ते व मानधन देणेत यावे.

**श्रीमती जयश्री पाटील, सदस्याः-** जिल्हा परिषदेच्या शैक्षणिक दर्जाबद्यल आपण बोलतो. परंतू आपणच खाजगी शाळांना मान्यता देता. जि.प.च्या शाळांमध्ये फक्त गोरगरीबांची मुले येतात. सर्व सदस्यांनी आपली मुले जि.प.च्याच शाळेत घालावीत. आपण गोरगरीबांचे प्रतिनिधी म्हणू न काम करतो. म्हणून खाजगी शाळांना मान्यता देणेत येऊ नयेत.

**श्री.रविंद्र बर्डे, सभापती,पं.स.वाळवाः-** शैक्षणिक गुणवत्तेच्या दर्जाबाबत आपण चर्चा करतो. आर.टी.ई.ॲक्ट बाबत श्री.बसवराज पाटील यांनी आपली भूमिका मांडली. शैक्षणिक गुणवत्ता विकासाचा मागील वर्षाचा आढावाबाबत पुस्तक उपलब्ध करुन दिलेली आहेत. शासनाने आरटीई ॲक्ट गतवर्षी राबविला. त्या ॲक्टनुसार शाळांमध्ये सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शासनाची आहे. ज्या लोकांची ऐपत नसते त्यांना जिल्हा परिषदेच्या शाळेशिवाय पर्याय नाही. सर्व स्तरावरील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणायचे झाले तर जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविणे महत्त्वाचे आहे. आणि शाळा टिकवावयाच्या असतील तर गुणवत्ता विकासाचा आढावा घेतला पाहिजे. शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय , स्वच्छतागृह व इतर सुविधा पुरविणे हे महत्त्वाचे आहेच परंतु त्या शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण देतात की नाही याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. आपली सर्व यंत्रणा कामाला लावली पाहिजे. यामध्ये गतवर्षी शिक्षणाधिकारी यांना प्रभावीपणे काम करता आलेले नाही. गतवर्षी शिक्षकांच्या ब-याच जागा रिक्त राहिल्या. रिक्त जागा भरणेचे ठरले परंतू घेवू शकलो नाही. शाळांची तपासणी मोहिम घेतली पण तो वेळकाढूपणा झाला. शिक्षक कोर्टात गेल्यामुळे पदे भरण्यास स्थगिती आली. कांही महत्त्वाचे निर्णय तातडीने घेणेची सवय लावून घेतली पाहिजे. शिक्षकांच्या बदल्यांचेवेळी समुपदेशन वेळेत घेत नाहीत. ज्या त्या वेळी जे ते निर्णय घेतले पाहिजेत. अनेक ठिकाणी गंभीर प्रश्न आहेत. तक्रारी असलेल्या शिक्षकांचेवर सुध्दा त्वरीत कारवाई केली पाहिजे. गावांनी शाळेला कुलूप लावले तर त्वरीत त्याची चौकशी क रुन कारवाई केली पाहिजे. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने उपाययोजना केली पाहिजे. शाळेच्या वेळेपूर्वी येऊन अभ्यासात कमी असलेल्या विद्यार्थ्यांना शिकविणेचे चित्र आता दिसत नाही. शिक्षणाच्या बाबतीत असलेली तळमळीची भावना लक्षात घेवून कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**श्री.भिमराव माने, सदस्यः-** यासाठी आपला कर्मचारी म्हणजे शिक्षक, डॉक्टर किंवा इतर सर्व स्तरावरील कर्मचारी यांची नियुक्ती ज्या ठिकाणी आहे त्या गावांत राहिले पाहिजे. शिक्षकांचा व्याप भरपूर असतो. जे नियुक्तीच्या ठिकाणी रहात नाहीत त्यांना घरभाडे भत्ता बंद करावा असा ठराव केला होता त्याची अंमलबजावणी केली कां?

**श्री.लिंबाजी पाटील, उपाध्यक्षः-** जो कर्मचारी नियुक्तीच्या ठिकाणी रहात नसेल त्याचा घरभाडे भत्ता कपात करणेत यावा.

**श्री.सुरेश मोहिते, सदस्य:-** हा त्यावरचा उपाय नाही. त्यांनी नियुक्तीच्या गांवात राहिलेच पाहिजे. या कायद्याची अंमलबजावणी कां होत नाही?

**श्री.भिमराव माने,सदस्य :-** शिक्षकांची मुले इंग्रजी माध्यमातून शहरातील शाळेमध्ये शिकतात व गोरगरीबांची मुले जि.प.शाळेत शिकतात त्यांना जास्तीत जास्त वेळ देणेसाठी शिक्षकांनी मुख्यालयी राहणे आवश्यक आहे. गेली तीन वर्षे झाली हा मुद्दा मी सभागृहामध्ये मांडत आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी:-** जे शिक्षक किंवा इतर सर्वच (ग्रामसेवक, डॉक्टर इ.) कर्मचारी नियुक्तीच्या ठिकाणी रहात नसतील तर त्यांचा घरभाडेभत्ता बंद करणेत यावा.

**श्री.नामदेव माळी, सदस्य :-** शिक्षक सोडून इतर कर्मचारी स्वतःच्याच गावांत रहातात व मोटरसायकलवरुन येऊन जावून करतात.

**मुख्य कार्यकारी अधिकारी:-** जे कर्मचारी मुख्यालयात रहाणे आवश्यक आहे परंतू ते मुख्यालयात रहात नाहीत अशा कर्मचा-यांचा घरभाडे भत्ता बंद करणेत येत आहे.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षा :-** जिल्हा परिषदेच्या अधिनस्त जे कर्मचारी मुख्यालयात रहाणे गरजेचे आहे असे कर्मचारी ज्या ठिकाणी नियुक्ती असेल त्या ठिकाणी रहात नसतील तर त्यांचा घरभाडे भत्ता बंद करणेत यावा.

**श्री.भिमराव माने, सदस्य:-** बोगस दाखले दिलेल्या शिक्षकांचेवर पोलिस केस दाखल केली कां? त्यांना निलंबीत केले कां?

**मुख्य कार्यकारी अधिकारी:-** आंतर जिल्हा बदली प्रस्तावासोबत शिक्षकांनी बोगस दाखले दिलेले होते. ते इतर जिल्हयातील शिक्षक असलेने त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत संबंधीत जिल्हयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविणेत आले आहे.

**श्री.भिमराव माने,सदस्य :-** सर्व सन्मा पदाधिकारी यांनी देखील मुख्यालयी राहणेचे आहे.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** पती-पत्नी एकाच ठिकाणी काम करतात परंतू दोघेही स्वतंत्रपणे घरभाडे भत्ता घेतात त्या दोघानांही घरभाडे भत्ता देय आहे कां याची चौकशी करुन संबंधीतांकडून घरभाडेभत्ता वसूल करणेत यावा.

**सौ.कल्पना सावंत, सदस्य:-** ज्या शिक्षिकांचे माहेरचेच नांव आहे त्यांना घरभाडे भत्ता देणार की नाही?

**सौ.छाया खरमाटे, सदस्या:-** जिल्हा परिषद सभेमध्ये जे ठराव झाले त्याचेवर कार्यवाही झालेली नाही. जि.प.मालकीच्या जागांवर अतिक्रमण केलेल्या लोकांचेवर फौजदारी गुन्हा दाखल केलेले नाहीत. आपण ठराव घेतो पण त्याची अंमलबजावणी करावयाची नसेल तर तो सभागृहाचा अवमान करत आहोत. जर ठरावावर कार्यवाही होणार असेल तरच ठराव मांडले जातील. पहिल्या सभेपासून माझी ही भूमिका आहे.

**श्री.सुरेश मोहिते, सदस्य:-** सामान्य प्रशासन विभागामार्फत जि.प. सभेमध्ये झालेल्या प्रत्येक मुद्दे निहाय व ठराव निहाय माहिती विभागांना कळविली जाते. ठरावाचा लागू पुरता उतारा सर्व खाते प्रमुखांना पुढील कार्यवाही साठी दिलेले आहेत. मात्र विभागामार्फत कोणतीही कार्यवाही केली जात नाही सामान्य प्रशासन विभागाचे काम अत्यंत चांगले आहे.

**श्री.देवराज जनार्दन पाटील/सुरेश मोहिते सदस्य-** मागील दिनांक १२.०३.२०१५ रोजी झालेल्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेत येत आहे.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) तथा सचिव -** विषय क्र.२ ते ५ च्या माहिती पुस्तीका सर्वांना देणेत आल्या आहेत.

**<u>विषय क्र.०२ :-</u>** सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमाचा आढावा घेणेत आला.

**<u>विषय क्र.०३ :-</u>** महिला- पुरुष जन्मदर या विषयावरील कामकाजाचा आढावा घेणेत आला.

**विषय क्र.०४ :-** कुपोषण निर्मूलन या विषयावरील कामकाजाचा आढावा घेणेत आला.

**विषय क्र.०५ :-** संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमाचा आढावा घेणेत आला.

**विषय क्र.०६ :-** सांगली जिल्हा परिषदेच्या स्विय निधी,पंचायत समिती सेस व ग्रामिण पाणी पुरवठा कडील देखभाल दुरुस्ती निधीचे सन २०१४-१५ चे अंतिम सुधारीत व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रकास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यता घेणेत आलेली आहे.सदरचे अंदाजपत्रकअवलोकनार्थ सादर करणेबाबत विचार करणे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य** :- सन २०१५-१६ चे स्वीय निधीचे अंदाजपत्रक मंजूरीचे वेळेस आचारसंहितेमुळे चर्चा करु शकलो नव्हतो. या अनुषंगाने कांही सूचना करावयाच्या आहेत.

१) अंदाजपत्रक म्हणजे प्रशासनाचा आरसा असतो. धोरण प्रतिबींबीत होत असते. निश्चित केलेल्या धोरणांची तंतोतंत अंमलबजावणी होऊन योजना राबविल्या जातात कां हे समजते. गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकांत अनेक महत्त्वाच्या योजना घेतल्या परंतू त्याची अंमलबजावणी झाली नाही. अनेक योजना करु शकलो नाही. बजेटमध्ये अशा अनेक योजना आहेत की त्यांचेबाबत निर्णय क्षमता दाखवू शकलो नाही. म्हणून संबंधीत योजनांवर खर्च झालेला नाही. शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमावर प्रत्येक सभेत चर्चा केली जाते. मा.आयुक्त, पुणे यांनी चर्चा करुन गुणवत्ता विकास कार्यक्रम आखला. त्यासाठी र.रु.८ लाख तरतूद केली. परंतू वर्षाअखेरीस र.रु.१ लाख ९ हजार खर्च करु शकलो नाही.

२) aशैक्षणिक उठावासाठी जिल्हयात बहुतांशी शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा योजना घेतल्या. त्यासाठी रु.१ कोटी २५लाख तरतूद केली परंतू खर्च मात्र रु.८१ लाख झाला म्हणजे ६५ टक्के खर्च झाला. व्यवस्थित खर्चाचे नियोजन करु शकलो असतो.

३) DOT साठी रु. २५ लाख तरतूद केली परंतू एक रुपयासुध्दा खर्च नाही.

४) पाझर तलाव दुरुस्तीसाठी कोल इंडियाकडून एक कोटी रु. मिळाले परंतू ७७ टक्के खर्च झाला आहे.

५) आरोग्य विभागाकडील ह्दयशस्त्रक्रिया, मूत्रपिंड रोपण साठी आर्थिक मदतीसाठी प्रस्ताव भरपूर येतात. या योजनेसाठी तरतूद वाढवून मागायला पाहिजे होती. परंतू रु.८ लाख ८० हजार तरतूद असताना फक्त २९ टक्के खर्च केलेला आहे. नियोजन नसलेने खर्च करु शकलो नाही.

६) लेक वाचवा, योजने संदर्भात सातत्याने मोहिम घेणेत आल्या. परंतू रु.३५ लाख तरतूद असताना रु.२० लाख खर्च करु शकलो.

७) चालू वर्षी यशवंत घरकुल योजना ही चांगली योजना घेतली आहे. परंतू मूळ योजनेचे काय चित्र दिसते आहे, वसंत घरकुल योजनेसाठी रु.२॥ कोटी तरतूद केलेली होती , सर्व सदस्यांनी प्रस्ताव मंजूर होणेसाठी धडपड केलेली होती. यामध्ये र.रु.१ कोटी ८८लाख खर्च झालेला आहे. ७५ टक्के खर्च झाला आहे. अपंग घरकुलसाठी रु. २ कोटी तरतूद होती पैकी रु.१ कोटी खर्च झाला म्हणजे ५० टक्के खर्च झालेला आहे. अशा परिस्थितीमध्ये नवीन घरकुल योजना कशी करणार अशी शंका आहे. खर्चाचे वेळापत्रक पाळले पाहिजे. कसा खर्च झाला पाहिजे याचा पाठपुरावा होत नाही. वर्षाअखेरीस मूल्यमापन होते. अपंगांना स्वयंरोजगारासाठी साहित्य पुरविणे यासाठी ६० लाख रु. तरतूद होती परंतू खर्च ३७ लाख झालेला आहे.